**नि.फौ.ख.क्र. १२५/२०२५**
**सरकार वि. शैलेंद्र**
**नि.क्र.२१.**

सरकारतर्फे **साक्षदार क्रमांक २** यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि

| | | |
|---|---|---|
| **नाव** | - | **गणपत महादेव वाघमारे,** |
| वय | - | ७० वर्ष, व्यवसाय – शेती. |
| राहणार | - | खंडाळा, ता. मौदा, जि. नागपूर. |

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एस. जी. इंगळे यांच्यामार्फत -**

**१.** फिर्यादी रत्नमाला माझी सुन असल्याकारणाने मी तिला ओळखतो. आरोपी शैलेंद्र हा माझा भासा असल्याकारणाने मी त्याला ओळखतो. घटना १२ महिन्यांपूर्वी माझ्या जुन्या घरी म्हणजेच पानतावने व गजभिये यांच्या घराजवळ दुपारी ०४.०० वाजता दरम्यान घडली होती. त्यावेळेस मी माझी बहिण चिंधाबाई बेलेकर हिच्या घरी होतो. रवींद्र व आरोपी शैलेंद्र यांची जुन्या घरी खंब्याजवळ मारपीट झाली व आरोपी शैलेंद्रने रवींद्रच्या पत्नीला गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांची सोडवा-सोडवी झाली. त्यानंतर रिपोर्ट दिली. दुसऱ्या दिवशी घटनास्थळ पंचनामा केला. पोलीसांनी मला पंचनाम्याकरिता कुठलाही कागद दिला नव्हता.

**२.** पोलीसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. त्यानंतर मी पो.स्टे.ला जाऊन त्यावर सही केली. आता मला निशाणी क्र.१९ वरील समंस व निशाणी क्र.२० वरील घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही नाही.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपींचे विद्वान वकिल श्री. ए. एस. रेवतकर यांच्यामार्फत –**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीची सासु तानाबाई माझी बहिण आहे. माझी बहिण तानाबाई हिला चार मुले आहेत. तिच्या सर्व मुलांचे लग्न झाले आहे. त्यांच्याकडे सहा एकर शेती असून त्यांची आपसी वाटणी झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, तानाबाई ही तिचा मुलगा शिशुपालजवळ राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी बहिण तानाबाईचा शेतीतील हिस्स्याची शिशुपाल वाहिजुत करते. हे म्हणणे खरे आहे की, तानाबाईला लकवा मारलेला आहे.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व तिचा पती रवींद्र तानाबाईकडे तिच्या हिस्स्यातील शेती त्यांना वहिजुत करण्याकरिता मागायला गेले होते. तानाबाईच्या हिस्स्यातील शेती जो तिला वागवेल तो ती करेल असे पूर्वीच ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी शैलेंद्रसोबत

फिर्यादीचे पती रवींद्र याने वाद घातला. हे म्हणणे खरे आहे की, रवींद्रने आरोपी शैलेंद्रला शिवीगाळ केली.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने रवींद्रच्या पत्नीला अश्लील भाषेत शिवीगाळ केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी रवींद्रसोबत पो.स्टे.ला गेलो होतो.

**उलटतपास संपला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.
दिनांक : १६.०४.२०२६

समक्ष,

Sd/-
**(एन.के. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मौदा